# नवप्रभा महिला नागरी पतसंस्था, हडपसर येथे सायबर जनजागृती अभियान उत्साहात संपन्न



पुणे, प्रतिनिधी : क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा २०२६' या उपक्रमांतर्गत नवप्रभा महिला नागरी पतसंस्था, हडपसर येथे सायबर जनजागृती सत्र उत्साहात संपन्न झाले.

अण्णासाहेबमगरमहाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स वैष्णवी भराटे आणि माही ओझरकर यांनी महिलांना ऑनलाइन फसवणूक, मजबूत पासवर्डचे महत्त्व, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, डिजिटल गोपनीयता, सायबर गुन्ह्यांपासून बचाव, तसेच सुरक्षित इंटरनेट वापराबाबत मार्गदर्शन केले. संस्थापक सदस्य दीपक जवंजाळ आणि विजय सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात महिलांना डिजिटल सुरक्षेचे महत्त्व सोप्या आणि प्रभावी पद्धतीने समजावून सांगण्यात आले.

यावेळी उदाहरणे, प्रात्यक्षिके आणि संवादात्मक उपक्रमांच्या माध्यमातून संशयास्पद लिंक, बनावट संदेश, ओटीपी फसवणूक, सायबर बुलिंग तसेच ऑनलाइन आर्थिक फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत माहिती देण्यात आली. महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारले, तसेच सायबर सुरक्षेबाबतच्या शंकांचे समाधान करून घेतले.

यावेळी पतसंस्थेच्या अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यांनी महिलांना सायबर सुरक्षेबाबत सतर्क राहण्याचे आवाहन करत अशा जनजागृती उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

या उपक्रमासाठी अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य प्रशांत मुळे, उपप्राचार्या शुभांगी औटी, संगणकशास्त्र विभागप्रमुख विलास वाणी, प्रा. मनिषा गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.